दिनांक **२१.०८.२०२३ ला झालेल्या निवड समिती सभेचे कार्यवृत्त अहवाल.**

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करीता पात्र उमेदवारांची निवड करण्यास्तव संभाव्य निवड यादीवर उमेदवारांनी घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्याबाबत दिनांक २१.०८.२०२३ ला दुपारी ०३.३० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षामध्ये निवड समिती सभा आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभेकरीता खालील प्रमाणे निवड समिती सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी | निवड समिती अध्यक्ष |
| २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) | निवड समिती सदस्य |
| ३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) | निवड समिती सदस्य |
| ४) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | निवड समिती सदस्य |
| ५) जिल्हा आरोग्य अधिकारी | निवड समिती सदस्य |
| ६) कार्यकारी अभियंता (बांधकाम) | निवड समिती सदस्य |
| ७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | निवड समिती सदस्य |

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ११.०७.२०२३ रोजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून १० टक्के पदभरतीबाबत सन २०२३ ची पात्र/अपात्र उमेदवारांची संभाव्य निवड यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादी प्रसिध्द केल्यापासून पात्र/अपात्र उमेदवारांकडून काही आक्षेप असल्यास त्यासंदर्भात दिनांक २०.०७.२०२३ पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर येथे सादर करण्यात आलेले आक्षेपांची यादी खालील प्रमाणे आहे.

**सन- २०२३ च्या संभाव्य निवड यादीवर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडुन प्राप्त आक्षेप अर्जाचे अनुपालन**

| **अ. क्र.** | **ग्रा.पं. व पं.स.चे नांव** | **कर्मचाऱ्याचे नांव व सादर केलेल्या आक्षेप अर्जाचा दिनांक** | **आक्षेप** | **आक्षेपाची पुर्ततावाबत अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| 1 | चिखली (खैरी), काटोल | श्री. मोरेश्वर पांडूरंगजी धारपूरे 12.07.2023 | 1 जानेवारी, 2020 च्या यादीत अ.क्र. 77 वर नाव समाविष्ट असून त्यावेळी वय 44 वर्षे होते. 3 वर्षाच्या कोव्हिड-19 मुळे मागील यादीतील कर्मचारी घेतलेले आहे. त्यामध्ये माझे नाव नसून यादीची पडताळणी करून नाव समाविष्ट करणे. | श्री. मोरेश्वर पांडूरंगजी धारपूरे यांची जन्म तारिख 11.02.1975 असुन दिनांक 1 जानेवारी, 2023 रोजी वय 48 वर्षे असल्यामुळे शा.नि.दिनांक 16.03.2023 अन्वये वयामध्ये 2 वर्ष सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार आपले नावाचा समावेश करता आलेला नाही. |
| 2 | खैरी(पन्ना से), हिंगणा | श्री दलिराम शिवचरण चौधरी 12.07.2023 | स्थापत्त अभियांत्रीकी कन्स्ट्रकशन प्रमाणपत्राची नोंद घेवून निवड समितीमध्ये माझी निवड स्थापत्य अभियांत्रिकी म्हणून करण्यात यावी. | श्री दलिराम शिवचरण चौधरी यांची शैक्षणिक अर्हता 12वी पास कला शाखा, MS-CIT, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ कंस्ट्रक्शन सुपरवाजर अर्हता धारण करीत आहे. तथापी त्यांचे नांव यादी मध्ये अ.क्र. 109 असुन " स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक "अशी एकुण 3 पदे असुन आपला अ.क्र.104 पर्यत संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे त्यांची " स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक " या पदाकरीता निवड करता आली नाही. |
| 3 | वागधरा (गुम.), हिंगणा | श्री. निरंजन टेकचंद चामाटे 12.07.2023 | सन 2023 चा यादीत नाव समाविष्ट नसल्यामुळे यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत. | श्री. निरंजन टेकचंद चामाटे शासन निर्णय दिनांक 16.03.2023 व शासन पत्र दिनांक 02.06.2023 अन्वये ज्या जिल्हा परिषदांनी सन 2019 मध्ये 10 % ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामधुन अद्याप पर्यत पदभरती केलेली नाही त्या जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचारी 1 जानेवारी 2019 रोजी ज्या उमेदवाराचे वय 45 वर्षापेक्षा अधिक नव्हते असे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सर्व उमेदवार दिनांक 31 डिसेंबर 2023 पर्यंत होणाऱ्या पदभरती प्रक्रीयेत पात्र असतील असे निर्देश आहे. तथापि जिल्हा परिषद नागपूर नी 10 % ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामधुन पदभरती प्रक्रीया पुर्ण केलेली असल्यामुळे शा.पत्र निर्देशानुसार सदर 2 वर्षाची शिथिलता हि सन 2023 मध्ये होणाऱ्या 10 % ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस लागु करण्यात आलेली आहे. अर्जदाराची जन्म तारिख 01.06.1975 असुन आजमितीस त्यांचे वय 48 वर्ष 2 महिने 22 दिवस आहे. त्यामुळे अर्जदाराला शासन निर्णयानुसार 2 वर्षाची शिथिलता देऊनही अर्जदार सन 2023 च्या पदभरती करीता पात्र ठरत नाही.आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 4 | किन्ही (धानोली), हिंगणा | श्री. संदीप सुधाकर बोंदाडे 13.07.2023 | कनिष्ठ सहा (लिपीक) म्हणून विचाराधीन असून माझे शैक्षणिक अर्हतेनुसार माझ्या नावाचा विचार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरिता निवड करावी. | श्री. संदीप सुधाकर बोंदाडे, यांचे अर्जानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्राप्त असल्यामुळे स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यक या पदावकरिता आपली निवड करण्यात आली आहे.आपला आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 5 | इटगाव, पारशिवनी | श्री शैलेश पंचम मोहनकर 13.07.2023 | MS-CIT प्रमाणपत्राची नोंद घेण्याबाबत | श्री शैलेश पंचम मोहनकर यांचे अर्जानुसार सन 2023 ची ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता दिनांक 08.05.2023 प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आपले MS-CIT प्रमाणपत्र दिनांक 16.05.2023 चे असल्याने सादर केले असून अर्जदार यांनी सदरचे प्रमाणपत्र हे 16 मे, 2023 मध्ये प्राप्त केल्यामुळे त्यांचे नाव 1.1.2023 ला तयार करण्यात आलेल्या सेवाजेष्ठता यादीमध्ये ग्राहय धरता येणार नाही. सदरची नोंद सन 2024 च्या दि. 1.1.2024 ला तयार करण्यात येणाऱ्या सेवाजेष्ठता यादीमध्ये नोदविण्यात येईल. |
| 6 | आपतूर, उमरेड | श्री रविंद्र नत्थुजी लांजेवार 14.07.2023 | संभाव्य यादीमध्ये 10 वी नापास दर्शविण्यात आलेले आहे. | श्री रविंद्र नत्थुजी लांजेवार यांच्या शैक्षणिक अर्हता सुधारीत करण्यात आलेली आहे.आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 7 | सालेशहरी(सालेभट्टी पूर्न), भिवापूर | श्री. राजकुमार श्रावणकुमार भोयर 14.07.2023 | YCMOU B.A. Final ची नोंद घेण्याबाबत | श्री.राजकुमार श्रावणकुमार भोयर यांच्या शैक्षणिक अर्हता सुधारीत करण्यात आलेली आहे.YCMOU B.A. Final चे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे नोंद घेण्यात येत आहे. आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 8 | सेलोटी, भिवापूर | श्री.गजानन भगवान चौधरी 14.07.2023 | पशु वैद्यकीय पर्यवेक्षक या पदाकरीता पात्र असून 10 टक्के मधून निवड करण्यात यावी | श्री.गजानन भगवान चौधरी यांचे नाव सेवाजेष्ठता यादी मध्ये अ.क्र.144 वर असल्याने संबंधिताचे नावा पर्यंत **पशुधन पर्यवेक्षक** पद रिक्त नसल्यामुळे निवड करता आलेली नाही. त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 9 | आंबोली, उमरेड | श्री. संजय नत्थुजी ठाकरे 14.07.2023 | 10 वी पास दर्शविल्यामुळे 10 वी पास अशी दुरुस्ती करण्याबाबत. | श्री. संजय नत्थुजी ठाकरे यांच्या शैक्षणिक अर्हता सुधारीत करण्यात आलेली आहे.आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 10 | पिपरीया, रामटेक | श्री विजय हरीचंद मडावी 14.07.2023 | अ.क्र. 124 वर नाव असून माझे नाव ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांमधून 10 टक्के पद भरती संभाव्य निवड यादी मधून वगळण्यात आले. त्यामुळे यादीत नाव समाविष्ट करण्यात यावे. | श्री विजय हरीचंद मडावी यांचे अर्जानुसार ग्राम विकास विभागाचे शा.नि.दिनांक 16.03.2023 अन्वये वयात दोन वर्षाची सवलत देण्यात आली असल्याने दिनांक 01.01.2021 व दिनांक 01.01.2023 च्या अंतिम सेवा जेष्ठता याद्या ग्राह्य धरण्यात आल्या. यांचे नांव सन 2021 च्या तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादी मध्ये अ.क्र.124 वर घेण्यात आले.परंतु अंतिम सेवा जेष्ठता यादीमध्ये अ.क्र.126 वर नांव घेण्यात आलेले आहे.संभाव्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | निवड यादी 2023मध्ये अ.क्र.124 पर्यत पात्र उमेदवार असल्याने अ.क्र.126 पर्यत शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेच्या अधिन राहुन वर्ग-3 ची पदे उपलब्ध नसल्याने त्यापुढील उमेदवाराचा विचार करण्यात आलेला नाही. |
| 11 | सिर्सी, उमरेड | श्री.किशोर बबनराव लोखंडे 14.07.2023 | शैक्षणिक अर्हता 12 वी पास, बी.ए. पास, MS-CIT तथा काम्प्युटर टायपिंग असून विस्तार अधिकारी (सां), वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, ग्रामसेवक यापैकी एका पदावर पात्र करावे. | श्री.किशोर बबनराव लोखंडे यांचे नाव संभाव्य निवड यादी मध्ये अ.क्र.100 असुन त्यांनी मागणी केल्यानुसार त्यांचा अ.क्र. येण्यापुर्वी विस्तार अधिकारी (सां.),वरिष्ठ सहाय्यक व ग्रामसेवक हि पदे संपुष्टात आली आहे. तसेच कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) या पदाकरीता मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि.आवश्यक आहे.सदर मराठी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण नसल्याने आपण कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) पदाकरीता पात्र ठरत नाहीत. आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 12 | फेटरी, काटोल | श्री.गिरीष मारोतराव येवले 17.07.2023 | 12 वी पास असल्यामुळे माझा विचार करण्यात यावे व शिक्षण गृहीत धरण्यात यावे. | श्री.गिरीष मारोतराव येवले यांचे अर्जानुसार शासन निर्णय दि.20.05.2011 अन्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक येथील प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतुन नियुक्तीसाठी ज्या पदांचा सेवा प्रवेश नियमात इ.10 वी व 12 वी माध्यमिक / उच्च माध्यमिक परिक्षा उत्तीर्ण असुन किमान अर्हता विहीत केलेली असेल त्याबाबतीत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पुर्व परिक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परिक्षेची प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला किंवा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातुन पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा असे निर्देश आहे. आपण फक्त पुर्व परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे. प्रथम वर्ष किंवा पदवी परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही करीता आपला आक्षेप ग्राह्य धरता येणार नाही. |
| 13 | अंबाडा (सो), काटोल | श्री.ओंकार नथ्थुजी मुळेकर 17.07.2023 | 12 वी सन 2019 ला उत्तीर्ण असून माझी नोंद घेवून मला यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे. | शासन निर्णय दि.20.05.2011 अन्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक येथील प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतुन नियुक्तीसाठी ज्या पदांचा सेवा प्रवेश नियमात इ.10 वी व 12 वी माध्यमिक / उच्च माध्यमिक परिक्षा उत्तीर्ण असुन किमान अर्हता विहीत केलेली असेल त्याबाबतीत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पुर्व परिक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परिक्षेची प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला किंवा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातुन पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा असे निर्देश आहे. आपण फक्त पुर्व परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे. प्रथम वर्ष किंवा पदवी परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही करीता आपला आक्षेप ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 14 | मनसर, रामटेक | श्री विलास शामरावजी मडावी 17.07.2023 | माझी शैक्षणिक अर्हता बी.ए. 3 उत्तीर्ण (पदवी) MS-CIT ही असून सन 2023 च्या सेवा जेष्ठता व आजची शैक्षणिक अहर्ता चा विचार केल्यास संदर्भ क्र. 1 नुसार प्रसिध्द संभाव्य यादीमध्ये मी सुद्धा पात्र ठरत आहे. | श्री विलास शामरावजी मडावी यांचे आक्षेपानुसार सन 2023 चे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी दि.08.05.2023 ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे.आपला बी.ए.अंतिम वर्ष उत्तीर्ण केल्याचा निकाल दिनांक 06.07.2023 ला घोषित करण्यात आला असल्याने नोंद घेता येणार नाही.त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | केळवद, सावनेर | श्री. भास्कर नत्थुजी घानोडे 18.07.2023 | सन 2023 चा यादीत नाव समाविष्ट नसल्यामुळे यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत. | श्री. भास्कर नत्थुजी घानोडे यांचे अर्जानुसार पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून सन 2023 ची ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक 08.05.2023 ला प्रसिध्द करण्यात आली आहे. आपला प्रस्ताव गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचे कडून दिनांक 16/6/2023 रोजी पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना सादर करण्यात आलेले आहे. प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे दि. 1.1.2023 च्या यादीमध्ये नाव समाविष्ट करता आले नाही. त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 16 | केळवद, सावनेर | श्री. नरेंद्र किसनजी तळेकर 18.07.2023 | सन 2023 चा यादीत नाव समाविष्ट नसल्यामुळे यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत. | श्री. नरेंद्र किसनजी तळेकर यांचे अर्जानुसार पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून सन 2023 ची ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक 08.05.2023 ला प्रसिध्द करण्यात आली आहे. आपला प्रस्ताव गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचे कडून दिनांक 16/6/2023 रोजी पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना सादर करण्यात आलेले आहे. प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे दि. 1.1.2023 च्या यादीमध्ये नाव समाविष्ट करता आले नाही. त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 17 | | अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत कामगार सेना,मौदा 18.07.2023 | 10 टकके पद भरती घेण्यात आलेली नसून यादीवर आक्षेप घेण्यात आलेले आहे. | अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत कामगार सेना,मौदा यांनी सादर केलेल्या अर्जानुसार ग्राम विकास विभागाचे शासन पत्र दिनांक 02.06.2023 अन्वये वयात दोन वर्षाची सवलत देण्यात आली असल्याने दि.01.01.2021 व दि.01.01.2023 ची अंतिम सेवा जेष्ठता यादी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. |
| 18 | खैरी (बिजेवाडा) , रामटेक | श्री. श्रीकांत संजय चौधरी 18.07.2023 | 1. यादीमध्ये फक्त अ.क्र. 1 ते 124 कर्मचाऱ्यांची नांवे कोणत्या पध्दतीने घेण्यात आली. | ग्राम विकास विभागाचे शा.निर्णय दिनांक 16.03.2023 व शासन पत्र दिनांक 02.06.2023 अन्वये पंचायत विभाग, जि.प. नागपूर यांचेकडून प्राप्त यादीनुसार घेण्यात आली. |
| | | | 2. अ.क्र. 125 ते 134 यांचा विचार केव्हा करण्यांत येईल. | शासनाचा पुढील आदेशानुसार तसेच निर्देशानुसार जर सन 2024 चा पदभरतीस मान्यता प्रदान करण्यात आली तर उपलब्ध पदानुसार रिक्त असलेल्या वर्ग-3 चा पदावर विचार करण्यात येईल. |
| | | | 3. या यादीमध्ये अनु.जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची नांवे असून त्यांना पदभरतीतून डावलण्यात का आले. | पदभरतीचा यादीमध्ये पंचायत विभाग, नागपूर यांचेकडून प्राप्त यादीनुसार नावाचा समावेश असून संभाव्य निवड यादीमध्ये पात्र करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची निवड ही सेवाजेष्ठताप्रमाणे त्यांनी धारण केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेप्रमाणे उपलब्ध असलेल्या पदाला आवश्यक असलेल शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार विचार करण्यात आलेली आहे. सामाजिक आरक्षणानुसार नाही. |
| | | | 4. 2021 च्या यादीत जातीचे वर्गवारी अ.ज. असतांना पद भरती यादीत त्यांना वि.मा.प्र. नुसार पदोन्नती देण्यात येत आहे ते कसे. | सदर पदभरती मध्ये कोणालाही पदोन्नती देण्यात येत नाही. पदभरतीमध्ये संबंधित कर्मचारी यांनी त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक तसेच इतर दस्तावेज, जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यानुसार त्यांचे नावा समोर जातीची नोंद करण्यात आलेली आहे. सदर पदभरती ही जातीच्या प्रवर्गा नुसार करण्यात येत नसून सेवाजेष्ठतेनुसार करण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 2021 च्या सेवा जेष्ठता यादीमध्ये नांवे नसतांना पद भरती अनु.क्र. 78 श्री. विलास सुदाम कौंडळकर व अनु. क. 102 श्री. नरेश भिकुजी चौधरी यांची नावे कशी घेण्यात आली. | सन 2021 च्या अंतिम सेवा जेष्ठ यादी मध्ये अ.क्र.78 वर श्री.विलास सुदाम कौडलकर व अ.क्र.102 वर श्री.नरेश भिकुजी चौधरी यांचे नावाची नोंद असल्याने संभाव्य यादी मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| | | | 2021 च्या सेवा जेष्ठता यादीमध्ये नावासमोर शैक्षणिक अर्हता कमी असतांना पद भरती यादीमध्ये त्यांची शैक्षणिक अर्हतेत वाढ कशी करण्यात आली व त्यांना संभाव्य निवड यादीमध्ये कसे घेण्यांत आले. | शा.नि.दिनांक 16.03.2023 अन्वये अंतिम सेवा जेष्ठता यादी सन 2021 व सन 2023 ची यादी तयार करतानी संबंधित उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता हि सन 2023 च्या अंतिम सेवा जेष्ठता यादीवरून नोंद घेण्यात आलेली आहे. |
| 19 | धुरखेडा, उमरेड | श्री.मनोज ताराचंद वासे 18.07.2023 | ग्रामसेवक पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असूनही ग्रामसेवक पदाकरिता शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र नाही असे नमूद आहे. | श्री.मनोज ताराचंद वासे यांचे अर्जानुसार कंत्राटी ग्रामसेवक पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत तथापी त्यांचे नाव अ.क्र.123 वर असुन कंत्राटी ग्रामसेवकाची उपलब्ध असलेली एकुण सात पदे हि आपला अ.क्र.येण्यापुर्वीच अ.क्र.47 वर संपुष्टात आली आहे. त्यामुळे आपली कंत्राटी ग्रामसेवक पदाकरीता निवड करता आली नाही. त्यामुळे आपला आक्षेप अमान्य करण्यात येत आहे. |
| 20 | पांजरी बु, नागपूर | श्री रंजीत रमेश कांबळे 18.07.2023 | शैक्षणिक पात्रता सन 2022 पासून वाढली असल्यामुळे सुधारणा करण्यात यावी. | श्री रंजीत रमेश कांबळे यांचे अर्जानुसार आपली शैक्षणिक अर्हता 11 वी नापास असून आपण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथून कला शाखेत पदवी धारण केल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. सदरची नोंद प्रमाणपत्राचे आधारे यादी मध्ये समाविष्ठ करण्यात आली आहे. त्यामुळे आपला आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 21 | बांद्रा, रामटेक | श्री पांडूरंग महाग्या मसराम 19.07.2023 | सेवा जेष्ठता यादीमध्ये शैक्षणिक अर्हता कमी दर्शविण्यात आली आहे. 12 वी पास, एम.एस.सी.आय.टी. बी.कॉम 1 पास उत्तीर्ण असल्यामुळे संभाव्य निवड यादीमध्ये माझे नाव समाविष्ट करण्यात यावे. | श्री पांडूरंग महाग्या मसराम आपले अर्जानुसार सन 2023 चे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी दि.08.05.2023 ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे.आपण बी.कॉम.प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्याचा निकाल दिनांक 01.07.2023 ला घोषित करण्यात आला असल्याने पदवी ची नोंद घेता येणार नाही.तसेच MS-CIT उत्तीर्ण झालेची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| 22 | वासी, भिवापूर | श्री दिनेश सुर्यभान मानकर 20.07.2023 | व्हेटनरी डिप्लोमा समाविष्ठ का केले नाही. | श्री दिनेश सुर्यभान मानकर आपले अर्जानुसार व्हेटनरी डिप्लोमाची नोंद अर्जदाराच्या नावासमोरील व्यावसायिक अर्हतामध्ये घेण्यात आलेली आहे. त्यामुळे आपला आक्षेप मान्य करण्यात येत आहे. |
| 23 | देवलापार , रामटेक | श्री. धनराज डोमाजी पाटील 24.07.2023 | रिट याचिका क्र. 5390/2019 सिवील अर्ज क्रमांक 2201/2023 नुसार सुनावणी घेवून न्यायोचित निर्णय घ्यावा. | श्री. धनराज डोमाजी पाटील रिट याचिका क्र. 5390/2019 सिवील अर्ज क्रमांक 2201/2023 नुसार सदर याचिकामध्ये दिलेल्या निर्देशानुसार सुनावणी दिनांक 04.08.2023 रोजी सुनावणी घेण्यात आलेली आहे. सुनावणी बाबतचा अहवाल तयार करून टपालाव्दारे पाठविण्यात आलेला आहे. |

(विपुल जाधव )
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**(सौम्या शर्मा,भाप्रसे )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नागपूर.**